**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय (विस्तार),

मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जुलै २०१४

## अधिसूचना

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक सीएसएल. २०१४/प्र.क्र.८९/१३ स.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.सीएसएल. २०१३/प्र.क्र. १२४/१५ स, दिनांक ३० मार्च २०१३ याद्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या प्रयोजनार्थ राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना केली आहे आणि सदर प्राधिकरणाचे कार्यालय पुणे येथे स्थित असेल असे निदेशित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास उक्त प्राधिकरणाचा कार्यालयीन पत्ता अधिसूचित करणे योग्य वाटत आहे ;

त्यामुळे आता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) च्या कलम ७३ कब याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि शासन अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सीएसएल. २०१३/प्र.क्र.१२४/१५सी, दिनांक २९ नोव्हेंबर २०१३ रद्द करून महाराष्ट्र शासन याद्वारे राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे कार्यालय खालील स्थळी असेल असे घोषित करते.

"राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला,
५, बी. जे. रोड, पुणे ४११ ००१
महाराष्ट्र राज्य."

---

—महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजगोपाल देवरा,
शासनाचे सचिव.

Scanned with CamScanner